**ठळक बातम्या**

- आगामी अर्थसंकल्पाच्या निमित्ताने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची विविध राज्यांच्या अर्थमंत्र्यांशी चर्चा

- परीक्षा पे चर्चा या उपक्रमासाठी विक्रमी ४ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

- UPSC च्या सर्व परीक्षांपूर्वी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याची पडताळणी होणार

आणि

- महिलांच्या प्रीमियर लीगमध्ये गुजरात जायंट्सची युपी वॉरियर्सवर मात

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पाच्या निमित्ताने राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांशी चर्चा केली. नवी दिल्लीत झालेल्या या चर्चेत केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीला सुरू होणार आहे.

<><><><><>

देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची असते, असं प्रतिपादन युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं. विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ परिषदेचं उद्घाटन मांडवीय यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- मनसुख मांडवीय***

तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, शाश्वत पर्याय आणि सामाजिक विकास अशा क्षेत्रांमध्ये विविध उपाय सुचवण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन मिळावं हे या संवादामागचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय यांनी सांगितलं.

भारतापुढे केवळ देशाच्या सीमा संरक्षित ठेवण्याचंच आव्हान नाही, तर आर्थिक आघाडीवरही देशाला सज्ज राहावं लागतं, असं मत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित

डोवाल यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केलं. तुम्ही युवा स्वतंत्र भारतात जन्माला आलात हे तुमचं भाग्य आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

युवा पिढीला परीक्षेच्या तणावापासून मुक्त करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाने देशव्यापी चळवळीचं स्वरूप घेतल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. परीक्षा पे चर्चा २०२६ मध्ये ऑनलाईन माध्यमातून सहभागी होण्यासाठी यंदा ४ कोटीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या ३ कोटी ५० लाखांपेक्षा जास्त नोंदणीच्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डला मागे टाकल्याचं त्यांनी म्हटलं आहे. 'परीक्षा पे चर्चा' हे बहुप्रतिक्षीत व्यासपीठ विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना एकत्र येऊन प्रधानमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची संधी देतं, असं ते म्हणाले.

<><><><><>

यु पी एस सी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निवड परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी प्रत्यक्ष चेहरा पडताळणीला सामोरं जावं लागणार आहे. २०२५ दरम्यान झालेल्या एन डी ए च्या, नेव्हल अकॅडेमि च्या आणि सी डी एस च्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचीही आयोगानं चेहरा पडताळणी केली होती. या पडताळणी दरम्यान विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जासोबत जोडलेलं त्यांचं छायाचित्र आणि त्यांच्या प्रत्यक्ष चेहऱ्याची यांत्रिक पद्धतीनं शहानिशा केली जाते.

<><><><><>

५३वा नवी दिल्ली जागतिक पुस्तक महोत्सव आजपासून भारत मंडपम इथं सुरू झाला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या महोत्सवाचं उद्घाटन केलं. प्रकाशक, लेखक, वाचक आणि सांस्कृतिक वर्तुळातले प्रतिनिधी ९ दिवसांच्या या महोत्सवात एकत्र येत आहेत. ३५ देशांमधल्या १ हजारापेक्षा जास्त प्रकाशकांनी यात भाग घेतला आहे. विविध विषयांवरची असंख्य पुस्तकं इथं वाचकांसाठी उपलब्ध आहेत. यंदा या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, 'भारताचा लष्करी इतिहासः शौर्य आणि बुद्धिमत्तेची ७५ वर्षं' अशी आहे. या विशेष दालनात या संकल्पनेशी संबंधित ५०० पेक्षा जास्त पुस्तकं आणि शंभरपेक्षा जास्त कार्यक्रम नागरिकांना अनुभवता येणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. सोमनाथमध्ये त्यांनी रोड शो मध्ये सहभाग नोंदवला. या दौऱ्यादरम्यान प्रधानमंत्री मोदी राजकोट इथं व्हायब्रंट गुजरात स्थानिक परिषदेचं उद्घाटन करतील, तर गांधीनगर इथं जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिच मर्ज यांची भेट घेतील.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल सरकार आणि ईडीनं कोलकात्यातल्या आय-पॅकच्या धाड प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. निवडणूक सल्लागार संस्था आय-पॅकच्या कोलकात्यातल्या कार्यालयावर ईडीनं गुरुवारी छापे टाकले होते. यादरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी याठिकाणी प्रवेश करुन छाप्यांना विरोध केला होता. त्यानंतर ईडीनं कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेऊन बॅनर्जी यांच्या सीबीआय चौकशीची मागणी केली होती.

**<><><><><>**

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, नागरिकांची बचत करण्यासाठी पुण्यातल्या नागरिकांना मेट्रो आणि बसचा प्रवास मोफत देण्याचं आश्वासन शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं पुणेकरांना दिलं आहे. दोन्ही पक्षांचा संयुक्त जाहीरनामा आज खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केला. त्यावेळी ते म्हणाले…

- **- - होल्ड - अजित पवार बाइट - - -**

या जाहीरनाम्यात त्यांनी अष्टसुत्री प्रगतीची, अष्टावधानी नेतृत्वाची मांडली आहे. त्यात दररोज नळाद्वारे पाणी, ट्रॅफिक आणि खड्डेमुक्त रस्ते, स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापन, परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्य सुविधा, झोपडपट्टी पुनर्वसन, जुन्या इमारतींचा पुनर्विकास यासारखी आश्वासन आहेत. याशिवाय लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आणि कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना ५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज, दीडशे पुणे मॉडेल स्कूल, विद्यार्थ्यांना मोफत टॅब, ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी यासारखी आश्वासन यात आहेत.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं पुणे महापालिका निवडणुकीसाठी आज वचननामा प्रकाशित केला. शिवसेना आणि मनसे एकत्रितपणे ही महापालिका निवडणूक लढवीत आहेत. ज्येष्ठ नागरिकांना मोफत औषध सुविधा, महिलांना मोफत पीएमपीचा प्रवास आणि पुणे गुन्हेगारीमुक्त करण्याचा शब्द यात दिला आहे.

<><><><><>

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सह-आरोपी तुषार आपटे यांनं ठाणे जिल्ह्यातल्या कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेतल्या 'स्वीकृत' नगरसेवक पदाचा राजीनामा दिला आहे. भारतीय जनता पक्षानं काल त्याची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर विरोधकांनी त्याच्यावर टीका केली होती.

<><><><><>

कायद्याचं उल्लंघन करून सेवा शुल्क आकारल्याबद्दल देशातल्या २७ उपाहारगृहांविरोधात सीसीपीए, अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं कारवाई केली आहे. या उपाहारगृहांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात आला असून, ग्राहकांना सेवा शुल्काची रक्कम परत करण्याचे आणि आपल्या बिलिंग प्रणालीमध्ये बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. यात मुंबईतल्या काही रेस्टॉरंटचा समावेश आहे. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, सेवा शुल्काची अनिवार्य आकारणी, ही अनुचित व्यापार पद्धत म्हणून घोषित करण्यात आली असून, सरकारी हेल्पलाईन नंबरवर ग्राहकांनी केलेल्या तक्रारीवरून सीसीपीएनं ही कारवाई केली.

<><><><><>

भारत आणि युरोपियन महासंघातल्या अडचणी दूर करुन वाटाघाटी वेगवान करण्याचे आदेश दोन्ही बाजूंनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि युरोपियन महासंघाचे व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयुक्त मारोस सेफकोविक यांनी आज ब्रुसेल्समध्ये परस्परांची भेट घेतली आणि वाटाघाटींच्या प्रगतीचा आढावा घेतला.

<><><><><>

महिला प्रीमियर लीगच्या आजच्या सामन्यात गुजरात जायंट्सनं यूपी वॉरियर्सचा १० धावांनी पराभव केला. नवी मुंबई इथं झालेल्या या सामन्यात आधी फलंदाजी करताना

गुजरातनं ४ खेळाडू गमावून २०७ धावांचा डोंगर रचला. प्रत्युत्तरादाखल यूपी वॉरियर्स संघाला ८ खेळाडूंच्या मोबदल्यात १९७ धावाच करता आल्या.

//<><><><><>//